जन - १९८८ १२०० (२)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प रि प त्र क

क्र.एमपीएम/७५३६ दि. १०.०८.२००२

विषय : बदलीचे आदेश प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्वरीत कार्यमुक्त करण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र.एमपीएम/१४५९ दि.२४.९.२००१

उपरोक्त संदर्भित परिपत्रकाद्वारे महानगरपालिका कर्मचाऱ्यांची नियमित बदली करावी, तसेच नियंत्रण अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय माहितीचे दि.३१.१०.२००१ पर्यन्त संगणकीकरण करावे, नियंत्रण अधिकाऱ्यांनी दिलेल्या बदली आदेशांचे पालन विनाविलंब केले जावे व ज्या कर्मचाऱ्यांच्या बदलीचे आदेश देण्यात आले असतील त्यांना कोणत्याही परिस्थितीत खाते प्रमुख/सहायक आयुक्त यांनी त्याच पदावर ठेऊन घेऊ नये असे निदेश देण्यात आलेले आहेत.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, नियंत्रण अधिकाऱ्यांनी अद्याप कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय माहितीचे संगणकीकरण केलेले नाही, तसेच कर्मचाऱ्यांच्या बदल्याही नियमितपणे करण्यात येत नाहीत व ज्या कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश निर्गमित करण्यात येतात, त्यांना कार्यमुक्त करण्यात येत नाही. त्यामुळे प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये अडथळा निर्माण होतो.

यास्तव, सर्व नियंत्रण अधिकारी/खाते प्रमुख/सहायक आयुक्त यांना खालीलप्रमाणे पुन्हा निदेश देण्यात येत आहेत :

१. सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय माहितीचे संगणकीकरण करावे व उपरोक्त संदर्भित परिपत्रकामधील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीतील एकूण पदनिहाय कर्मचारी/अधिकारी व त्यापैकी या वर्षी किती कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली याबाबतचा अहवाल दि.३०.९.२००२ पर्यन्त सह आयुक्त (सा.प्र.)/अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांना सादर करावा.

३. बदलीचे आदेश प्राप्त झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना त्वरीत कार्यमुक्त करावे. असे बदलीचे आदेश प्राप्त झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना ३ दिवसांच्या अवधीत कार्यमुक्त न केल्यास त्यांचे वेतन व भत्ते मूळ खात्याच्या आस्थापनेवर काढता येणार नाही. अशा कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांच्या मूळ आस्थापनेवर काढल्यास संबंधित लेखा विभागाने त्यांचे वेतन रोखून ठेवावे.

जन - १९८ 

सर्व नियंत्रण अधिकारी/खाते प्रमुख/सहायक आयुक्त/लेखा अधिकारी यांनी वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर आदेशांची अंमलबजावणी करण्यामध्ये हलगर्जीपणा/निष्काळजीपणा/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-(२६.७.०२) | सही/-(२६.७.०२) | सही/-(२९.७.०२) |
| (ज्ञा.शं.महाडदळकर) | (श.रं.डांगे) | (विद्याधर कानडे) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र.एमपीएम/७५३६ दि.१०.८.२००२

सापवि/५
२००२-२००३

प्रत ~~कार्यालय अधिक्षक (भि.च.व.)~~ यांना (०२ जादा) प्रतींसह माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

५/८/०२

प्रमुख कर्मचारी अधिकारी यांजकरिता